क्रमांक:जमीन-२६८९/१९८३/प्र. क्र. २१५७/ज३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:१० जानेवारी १९९७

विषय:- जमीन-मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मनोरी येथील स.क्र. २९५-अ
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास
गोल्फ कोर्स व इतर पर्यटन विकासाकरिता
जमीन देण्याबाबत--

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या वरील विषयावरील क्र. कार्या-३-डि/वशी-६५५/९६, दिनांक १२.९.१९९६ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात मला निदेश आहे की, मौजे मनोरी येथील सर्व्हे क्रमांक २९५-अ मधील सुमारे हेक्टर २८८.५१ आर[७१२ एकर ३३ गुंठे] जमीन पर्यटन विकासार्थ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत मंडळाने केलेली अ विनंती शासनाच्या विचाराधीन होती. प्रस्तुत क्षेत्र मंजूर विकास योजनेत "ना विकास क्षेत्रात" अंतर्भूत आहे. या सुमारे ७१२एकर ३३ गुंठे] क्षेत्रापैकी अतिक्रमणाविरहित उपलब्ध होणारे क्षेत्र महामंडळास गोल्फ कोर्स व इतर पर्यटन विकासाकरिता देण्यास नेहमीच्या अटी/शर्तीवर व खालील बाबींच्या अधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

1] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी-१०९३/प्र.क्र. ५५/ज१, दिनांक १७.२.९५ मधील धोरण व त्याखालील अटी/शर्ती.
2] शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टीपीबी-४३९२/६०६५/युडी-११[आरडीपी], दि. १९.९.९५ मध्ये दिलेली मार्गदर्शक तत्वे
3] कोस्टल रेग्युलेशन झोन संदर्भातील तरतुदी.
4] जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्ती:

२. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रस्तुत जमिनीची संयुक्त मोजणी करून उपलब्ध होणारे अतिक्रमण विरहित क्षेत्र महामंडळाला मंजूर करावे.

....२/--

३. हे ज्ञापन नगर विकास विभाग व पर्यटन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. कि. आल्हाट

[ दि. कि. आल्हाट ]

कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एस. आर. डी. ए. इमारत,
वान्द्रे [ पू ] मुंबई-४०००५१

प्रत:-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२] जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे

३] उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई

४] सहायक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, मुंबई उपनगर जि

५] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६] महालेखापाल, [ लेखा व अनुज्ञेयता ] महाराष्ट्र राज्य, मुंबई

७] महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,
एक्सप्रेस टॉवर्स, ९ वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.

८] पर्यटन विभाग

९] नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१०] ज-३ का. [ निवडनस्तीकरिता ] महसूल व वन विभाग

क्रमांक सी/कार्या-३डी/महसूल ६३/एल ~~---~~ ५८३
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी.एस.आर.डी.ए. इमारत, वांद्रे [पूर्व]
मुंबई ४०० ०५१.

दिनांक – ५-२-९७

वाचा:- १. शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन २६८९/१६८३/प्र.क्र. २१५७/ज-२ दिनांक १० जानेवारी १९९७.

२. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९३/प्र.क्र.५५/ज-१ दिनांक १७.२.९५

## आदेश

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना पर्यटन विकासाकरिता मौजे मनोरी येथील स.क्र. २९५ अ मधील सुमारे हेक्टर २८८.५९ आर [७१२ एकर] ~~३२~~ ३२ क्षेत्रापैकी अतिक्रमण विरहित उपलब्ध होणारे क्षेत्र या आदेशाच्या तारखेपासून ३० वर्षासाठी नाममात्र भाडे १/- भाडेपट्ट्याने महामंडळास गोल्फ कोर्स व इतर पर्यटन विकासाकरिता देण्यास नेहमीच्या अटी/शर्तींवर व खालील बाबींच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९३/प्र.क्र. ५५/ज-१ दिनांक १७.२.९५ मधील धोरण व त्याखालील अटी/शर्ती.

२. शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टीपीबी-४२९२/६०५५/यु.डी.-११/[आरडीपी] दिनांक १२.९.९५ मध्ये दिलेली मार्गदर्शक तत्वे [illegible] IX

३. कोस्टल रेग्युलेशन झोन संदर्भातील तरतुदी.

महामंडळास दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे] नियम १९७१ मधील नियम ३१ व ४१ मधील अटी व शर्तींना अधिन राहून पुढील ३० वर्षांसाठी नूतनीकरण करता येईल.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

Rcd.
Katkade
5-2-97
(कातकाडे लघुलेखक)

T/oc
5-2-97

प्रति,
महाव्यवस्थापक,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

प्रत- नगर भूमापन अधिकारी क्र.६ मु रहीवा मंझील, जोगेश्वरी, यांजकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

त्यांनी प्रश्नांधिन जमिनीची तहसिलदार बोरीवली व महामंडळ यांचे उपस्थितीमध्ये संयुक्त मोजणी करून अतिक्रमण विरहित महामंडळास मंजूर करण्या योग्य जमिनीचे सिमांकन करून जमिनीचा ताबा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास द्यावा तसेच ताबा पावती, नकाशाच्या पाच/पाच प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

प्रत- तहसिलदार बोरीवली यांजकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

त्यांनी प्रस्तुत प्रकरणी नगर भूमापन अधिकारी क्र.६ यांचे समवेत जमिनीची संयुक्त मोजणी करून उपलब्ध होणारे अतिक्रमण विरहित मोकळे क्षेत्र महामंडळास देणेबाबतची कार्यवाही करावी तसेच याबाबत ७/१२ ला आवश्यक त्या नोंदी १० फेब्रुवारी ८८ पूर्वी घेऊन पूर्तता अहवाल सादर करावा.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता

५२९७

T/oe
5-2-88

5/2/97
Issued Two (2)